# -: प्रमाणपत्र :-

श्री सुनिलदत्त आकाराम पाटील यांनी " रघुवीर सामंत, लिखितव्यक्तिचित्रांचा अभ्यास" या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरीतीने लघु-प्रबंधाचे लेखन केले आहे. प्रस्तुत लेखनातील विश्लेषण, विवेचन स्वतंत्र असून यातील कोणताही मजकूर अभ्यासकाने इतरत्र कुठेही उपयोगात आणलेला नाही.

प्रस्तुतचा विषय हा "ललित लेखन" या वाङ्‌मय प्रकारातील आहे. हा लघु-प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे एम.फिल.(मराठी) परीक्षेच्या परीक्षणासाठी अभ्यासकाने सादर करण्यास माझी अनुमती आहे.

मार्गदर्शक
(डॉ.डी.टी. माने)

PRINCIPAL
[illegible]
SOLAPUR
संगमेश्वर महाविद्यालय,
सोलापूर.

(डॉ. राजशेखर हिरेमठ)
मराठी विभाग प्रमुख
संगमेश्वर महाविद्यालय,
सोलापूर.

- प्रतिज्ञापत्र -

सुनिलदत्त आकाराम पाटील
एम्. ए.
मु.पो. एरंडोली ४१६४१०.
ता. मिरज, जि. सांगली.

मी सुनिलदत्त आकाराम पाटील प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो की,-

शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल [मराठी] पदवी परीक्षेसाठी सादर केलेल्या "रघुवीर सामंत लिखित व्यक्तिचित्रांचा अभ्यास" हा लघुप्रबंध मी स्वतः लिहिलेला असून तो पुर्णपणे स्वतंत्र आहे.

हा लघुप्रबंध मी इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही स्वरुपात पदवी इत्यादी कारणासाठी सादर केलेला नाही.

दिनांक :- ३१-१२-१९९६

सुनिलदत्त पाटील
[ सुनिलदत्त आ. पाटील ]

## - ऋण निर्देश -

"रघुवीर सामंत लिखित व्यक्तिचित्रांचा अभ्यास" हा विषय शिवाजी विद्यापीठाने मान्य केल्यानंतर त्या अनुषंगाने या जुन्या काळात होऊन गेलेल्या लेखकाच्या पुस्तक उपलब्धते पासून सुरुवात झाली. सन १९३० च्या दरम्यानचा हा लेखक आणि त्यांनी मराठीत शब्दचित्रे लिहून नवीनच वाङ्‌मय प्रकार रुढ केल्याचे माझ्या वाचनात आले. त्या दृष्टीने या लेखकाच्या काळासंबंधी त्या काळातील वाङ्‌मया संबंधी, मराठी अभ्यासकांनी आणि वाङ्‌मयीन टीकाकारांनी कांही लिहिले आहे कां? या संदर्भात शोध घेताना चरित्रकोश, मराठी सारस्वत, मराठी वाङ्‌मयाचा इतिहास या ग्रंथांमधून त्यांची त्रोटक माहिती दिल्याचे आढळून आले. "मराठी सारस्वत" या ग्रंथात आणि प्रा. वि.शं. चौघुले यांच्या "रघुवीर सामंत बेरीज आणि वजाबाकी" या ग्रंथात त्यांच्या पुस्तकांची माहिती मिळाली. परंतु या जुन्या लेखकाची पुस्तके उपलब्ध करण्यासाठी पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय आणि मुंबईत असणारे रघुवीर सामंताचे चिरंजीव श्री. दीपक सामंत यांच्याकडे मी पत्रव्यवहार केला. तथापी शिवाजी विद्यापीठाकडून त्यांचे "हृदय" हे पुस्तक उपलब्ध झाले. तसेच सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिश्चंद्र निर्मळे व ग्रंथपाल श्री. रास्ते यांचेकडून "तारांगण" तर मा.दीपक सामंत यांनी "मासलेवाईक प्राणी पहिले सात" व "मासलेवाईक प्राणी दुसरे सात" या पुस्तकांच्या झेरॉक्स प्रती पाठवून दिल्या. रघुवीर सामंताच्या नावावर शब्दचित्रांची पुस्तके असताना आज हि पुस्तके दुर्मिळ झाल्याचे दिसते. त्यामुळे पुस्तक उपलब्ध करण्यात बराच कालावधी गेला. पुस्तके उपलब्ध करून दिल्याबद्दल शिवाजी विद्यापीठ, विलिंग्डन महाविद्यालय आणि मा. दीपक सामंत व परिवार यांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

हा लघुप्रबंध माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.डी.टी. माने यांचे मार्गदर्शनाने आणि सहकार्याने पूर्ण केला. त्यांचे ही आभार मानतो. शिवाजी विद्यापीठाचे

मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे, प्रा. वि. शं. चौघुले, मुंबई, प्रा. वैजनाथ महाजन सांगली, प्रा. डॉ. बाबूराव गुरव तासगांव, प्रा. विश्वास दा. जाधव विटा, प्रा. अंकुश निकम, खानापूर, कु. स्वाती शिंदे सहसंपादिका "साप्ता-विटा एक्सप्रेस, जरंडी यांचेशी केलेल्या चर्चेचा प्रबंध लेखन करताना मला उपयोग झाला. त्यांचे ही आभार मानणे उचित आहे.

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री व सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री मा. नामदार श्री. आण्णासाहेब डांगे व इस्लामपूर येथील श्री. संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. सत्तू दोले या माझ्या हितचिंतकांनी प्रबंध साकारण्यासाठी हस्ते-परहस्ते मदत केली. माझे निकटवर्तीय पोसेवाडी, ता. खानापूर येथील प्राथमिक मराठी शाळेतील अध्यापक मा. धोंडीराम धोडगे गुरूजी व खेडबुद्रुक, ता. खंडाळा येथील न्यू इंग्लिश स्कूलचे मा. संभाजीराव जाधव या सुहृदयांनी प्रबंधासाठी आर्थिक मदत देऊन उपकृत केले त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

या शिवाजी प्रा. रावसाहेब पाटील श्री. शशिकांत पाटील, श्री. शंकर बाबर, श्री. आर. जे. पाटील, एरंडोली श्री. विजयकुमार डुंगळे आष्टा श्री. विकास पाटील, श्री. रमेश जाधव, श्री. राजवल्ली मुलाणी, प्रा. सुनिल चंदनशिवे पळशी श्री. राहुल कदम संपादक साप्ता. विटादर्शन विटा, श्री. हसनभाई आत्तार, श्री. सुनिल बा. पाटील खानापूर श्री. शं. तु. बांजरेकर इचलकरंजी श्री. महादेव माळी कलाध्यापक सिटी हायस्कूल, सांगली इत्यादी माझ्या हितचिंतकांनी पुस्तके उपलब्ध करून प्रोत्साहन दिले त्याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

## प्रास्ताविक -

" रघुवीर सामंत लिखित व्यक्तिचित्रांचा अभ्यास" या विषयाची मांडणी करीत असताना या संदर्भात अभ्यासाला सुरुवात केली. तथापी रघुवीर सामंत हे जुन्या काळातील प्रसिध्द लेखक होते. सन १९३२ ते १९६५ या काळात वाङ्:मयाच्या सर्व क्षेत्रात त्यांनी विविध आणि विपुल लेखन केल्याचे दिसते. तथापी आजच्या काळात त्यांची पुस्तके मिळणे दुरापास्त झाले. त्यांची व्यक्तिचित्रांची पुस्तके मिळाल्यानंतर त्यांच्या वाचन, मननातून या लेखकाची वाङ्:मयीन दृष्टी फार व्यापक होती असे जाणवले. मांडणी करताना पार्श्वभूमी म्हणून प्राचीन मराठी वाङ्:मयातील शब्दचित्रांच्या चित्रणाचा शोध घ्यावा लागला. रघुवीर सामंतानी जशी शब्दचित्रे लिहिली आहेत तशा प्रकारच्या शब्दचित्रांचा आढळ सामंत पूर्व कालीन लेखनात व जुन्या वाङ्:मयात सापडणे कठीण कारण जुन्या वाङ्:मयाची प्रेरणा भक्त, भक्ती, भगवंत आणि गुरु यांचे विषयी असल्यामुळे जुन्या वाङ्:मयात व्यक्तिगत भाव भावनांच्या आविष्काराला कमी महत्व होते. भक्तीचा आविष्कार हाच एक तत्कालीन वाङ्:मयाचा गाभा होता.

ही व्यक्तिचित्रे कोणत्या वाङ्:मयीन गुणांनी भरलेली आहेत याचा शोध प्रत्यक्ष सामंतांच्या कथा वाचून त्याचे विवेचन करावे लागले आहे. त्यांनी हा शब्दचित्र वाङ्:मय प्रकार नव्याने रुढ केला असल्यामुळे शब्दचित्रांची बैठक कोणत्या मूल्यावर आधारलेली आहे या संबंधी इंग्रजी, हिंदी आणि मराठी अभ्यासकांनी कोणती चर्चा केली आहे. शब्दचित्रांच्या आकारासंबंधी काही

ढोबळ मानानी कक्षा निश्चित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. रघुवीर सामंतांच्या आगे मागे आणि पुढील साहित्यीकांनी शेकडो शब्दचित्रे लिहिल्याचे आढळून आले. रघुवीर सामंतांपासून माटे, माडगूळकरा-पर्यंतच्या कालखंडातील लेखकांच्या साहित्य कृतींतून कोणती आणि कशा प्रकारची शब्दचित्रे त्यांनी लिहिलेली आहेत त्याचे थोडक्यात संकलन ही द्यावे लागले आहे. पुढील लेखकांनी जी विविध स्तरांतील समाज घटकांतील शब्दचित्रे लिहिलेली आहेत तशाच प्रकारची रघुवीर सामंतांनी ५०/६० वर्षापूर्वी ही शब्दचित्रे लिहिलेली आहेत. त्यांचा वाङ्‌मयीन गुणात्मक दृष्टीने उहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे.

आणि शेवटी समारोपात रघुवीर सामंतांच्या वेळीची राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती आणि पुढील लेखकांच्या काळातील ही परिस्थिती या दोन्ही परिस्थितीतील समाज जीवनाच्या दृष्टीने काही बौध्दीक चर्चा करावी लागली आहे. रघुवीर सामंतांची केवळ शब्दचित्रांची तीन पुस्तके त्या संबंधी वाङ्‌मयीन टिकाकारांनी अत्यल्प प्रमाणात नोंद घेतलेली असताना रघुवीर सामंतांच्या केवळ शब्दचित्रांचा अभ्यास या प्रबंधिकेत पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.